# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## मंगळवार, दिनांक २ जुलै, २०२४/आषाढ ११, १९४६ शके

६९. महाराष्ट्र विधानसभा नियम १०६ (३) अन्वये शुक्रवार, दिनांक ५ जुलै, २०२४ रोजी सभागृहात चर्चेसाठी घेण्यात येणाऱ्या अशासकीय ठरावांच्या सूचना :-

(१) **श्री. संग्राम थोपटे, वि.स.स. यांचा ठराव क्र. ७३**

"पुणे महानगरपालिका क्षेत्रातील जुन्या व मोडकळीस आलेल्या वाडयांच्या पुनर्बांधणीसंदर्भात शासनाचे असलेले उदासीन धोरण तसेच प्रशासनाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या वाडयांची दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात वाडे कोसळून जिवीत व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या वाडयांची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच वाडयांच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यामुळे पुणे महापालिका क्षेत्राकरीता मुंबईच्या धर्तीवर दुरुस्ती मंडळाची स्थापना करण्याची येथील नागरीकांची असलेली मागणी, या संदर्भात साकल्याने विचार करुन त्यावर परिणामकारक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२) **डॉ. विश्वजीत कदम, वि.स.स. यांचा ठराव क्र. ११७**

"पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर या पाच जिल्हयातील जनतेच्या सोयीसाठी मुंबई उच्च न्यायालयाचे एक खंडपीठ पुणे येथे स्थापन करावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३) **श्री. विकास ठाकरे, वि.स.स. यांचा ठराव क्र. ९७**

"राज्यात अनाथ, निराधार, परितक्त्या, घटस्फोटित, विधवा व अनैतिकतेतून मातृत्व लाभलेल्या अपादग्रस्त व शिक्षणाचा अभाव असणाऱ्या महिलांचा यात होणारा शारीरिक, मानसिक व सामाजिक छळ थांबवून त्यांची शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नती होण्याच्या दृष्टीने महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(४) **श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांचा ठराव क्र. १६४**

"महाराष्ट्र राज्याला ७२० कि.मी.चा समुद्रकिनारा लाभलेला असून तो मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्हयांना स्पर्शून जातो, सदर जिल्हयातील जनतेचे मासेमारी हे पारंपारीक प्रमुख उत्पन्नाचे व जीवीताचे साधन असताना राज्यशासनाचे मत्स्य विद्यापीठाचे मुख्यालय नागपूर येथे असणे या जिल्हयांना सोईचे ठरत नसल्यामुळे मत्स्य विद्यापीठाचे मुख्यालय कोकणात असावे अशी शिफारस मा.खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केलेली आहे. त्या शिफारसीची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(५) **श्री. राजेश एकडे, वि.स.स. यांचा ठराव क्र. ३३**

"बुलढाणा जिल्हयातील जिगाव प्रकल्पासह राज्यातील वेगवेगळ्या प्रकाल्पामुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अजूनही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल त्यामुळे शासनाच्या विचाराधीन व महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी जमीन देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इत्यादी बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले कामे तत्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द धडक कार्यक्रम राबविण्यात यावा अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे"

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : २ जुलै, २०२४**

**जितेंद्र भोळे**
**सचिव- १ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत:**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
३. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
४. संगणक कक्ष (website)